# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर

## योजना

(१) "राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक वकलावंत यांना मानधन योजना"

(२) १५ वा वित्त आयोग

(३) इतर योजना

## "राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक वकलावंत यांना मानधन योजना"

जिल्ह्यातील कलाकार व साहित्यिक यांना मानधन देणेकरीता "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिकव कलावंत यांना मानधन सन्मान योजना राबविली जाते. यापूर्वी सदर योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविली जात होती.१६/०३/२०२४ रोजी सदर योजनेच्या संदर्भात पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून नवीन शासन निर्णय निर्गमित झाला आहे.त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बदल झाले आहेत.

- **योजनेचे नाव** : "राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजना"
- **कलाकार व साहित्यिक** : जे कलाकार १५ वर्षापेक्षा जास्त काळ प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात (performing art) सादरीकरण करणारे, केवळ संबंधित कलेवरच गुजराण असणारे कलाकार या योजनेसाठी पात्र असतील.
- **साहित्यिक:** जे साहित्यिक १५ वर्षापेक्षा जास्त काळ साहित्य क्षेत्रात लेखन करणारे केवळ त्यावरच गुजराण असणारे साहित्यीक कला क्षेत्राशी निगडीत लेखन समीक्षा करतात असे साहित्यिक या योजनेसाठी पात्र असतील.
- **मानधन :**कलावंतांना ५००० रु इतके मानधन DBT प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल.
- **पात्रता–**

१) ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त आहे. दिव्यांगाना वयाची अट १० वर्षाने शिथिल करण्यात येत आहे (दिव्यांगाना वयोमर्यादा ४० वर्षे)

२) ज्यांचे कला व साहित्यिक क्षेत्रात योगदान कमीत कामी १५ वर्षे आहे.

३)ज्यांनी कला व साहित्यिक व कला क्षेत्रात सातत्यपूर्ण,दर्जेदार व मोलाची भर घातली आहे.

४)वयाने जेष्ठ असणारे विधवा/परितक्त्या/दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य राहील.

५ )कलाकाराचे सर्व मार्गांनी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६००००/- पेक्षा जास्त नसावे.

६)ज्या कलाकारांची उपजिविका फक्त कलेवरच अवलंबून आहे असे कलाकार तसेच जे कलाकार फक्त कलेवरच अवलंबून होते,मात्र त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार.

७)केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडले इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार.

८)कलाकार/साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

यांप्रमाणे पात्र साहित्यिक कलावंत यांनी शासन निर्णय दि.१६ मार्च २०२४ नुसार ऑनलाईन पद्धतीने. https://mahakalasanman.org/pgeApplicationFormForUser.aspx या संकेतस्थळ वर अर्ज स्वीकारले जाणार आहे

## अर्ज करणेकरिता आवश्यक पुरावे/कागदपत्रे

| | |
|---|---|
| १ | कलाकारांचे नाव |
| २ | वयाचा दाखला(सर्वसाधारण -५० पेक्षा जास्त ,दिव्यांग -४०) |
| ३ | आधार कार्ड |
| ४ | उत्पन्नाचा  दाखला ( वार्षिक मर्यादा ६०००० ) |
| ५ | रहिवासी दाखला( स्वयघोषणं |
| ६ | प्रतिज्ञापत्र |
| ७ | पतीपत्नीचा एकत्रित फोटो (लागू अस्ल्यास ) |
| ८ | बँक तपशील (राष्ट्रीयाकुत बँकेचे नाव ,शाखा खाते क्र.IFSC code,मोबाईल नंबर ) |
| ९ | पूर्ण पत्ता |
| १० | अपंगत्व दाखला ( लागू असल्यास ) |
| ११ | राज्य/केंद्र सरकारचे पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास ) |
| १२ | नामांकित संस्था/व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागू असल्यास ) |
| १३ | विविध पुरावे (कला /साहित्य क्षेत्राशी संबंधित |

**कार्यपद्धती :**

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तर समिती  ज्यामध्ये मा पालकमंत्री यानी नामनिर्देशित केलेले १० सदस्य असतील. जिल्हास्तरावर सदर समितीमार्फत लाभार्थी निवड होऊन अंतिम यादी सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुबई  यांचेकडे सादर करण्यात येईल.

**विभाग :** ग्रामपंचायत विभाग

**प्रस्तावना**

**योजनेचे नाव – १५ वा वित्त आयोग.**

१. **योजनेचे कार्यक्षेत्र – जिल्हा परिषद अहिल्यानगर.**

२. **योजनेची कार्यपध्दती –**

v. ग्रामपंचायतींनी ज्या बँका इ.सी.एस. (Electronic Clearance System)/ एन.ई.एफ.टी. (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस (Real Time Gross Settlement) या आधुनिक बँकींग सुविधा उपलब्ध करून देतील अशा आय.एफ.एस.सी.(IFSC) कोड धारण केलेल्या व एम.आय.सी.आर (MICR) कोड असलेल्या **राष्ट्रीयकृत बँकेतील बचत खात्यामध्ये सदरचा निधी ठेवणे.**

v. सदर खात्यातील व्यवहार ग्रामपंचायतींच्या नावाने सरपंच व ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने होतील. तसेच पंचायत समितीच्या नावाने गट विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीने करणे.

v. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्तरावर करावयाच्या बाबींच्या नियोजनाचे अधिकार व जबाबदारी ग्रामपंचायतींच्या सभेची (कमिटीची) राहिल. मात्र ग्रामपंचायतीच्या सभेत (कमिटीत) घेतलेले निर्णय ग्रामपंचायतींनी वेळोवेळी ग्रामसभेत सादर करणे.

v. वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाचे नियोजन करताना गरजेवर आधारीत नियोजन होईल याचीही दक्षता घेणे.

vi. मान्य योजना व कार्यक्रमां व्यतिरीक्त इतर बाबी न घेणे. इतर बाब निकडीची वाटल्यास त्यासाठी राज्य शासनाची मंजूरी घेणे.

v. शासनाने विहित केलेल्या मान्य बाबींवरच या निधीतून प्राप्त होणाऱ्या व्याजाची रक्कम खर्च करणे व त्याचे हप्ता निहाय स्वतंत्र हिशेब ठेवणे.

v. ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण विहित वेळेत होईल याची काळजी घ्यावी व त्रुटींचे निराकरण तात्काळ करणे.

v. पंचायत राज संस्थांकडून प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही व जास्तीचे आर्थीक दायित्व निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे.

v. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ज्या बाबी/योजना/कार्यक्रम हाती घेण्यात आले असतील त्याचे दर्शक फलक संबंधित बाबी/योजना/कार्यक्रमाच्या ठिकाणी ठळकपणे दिसतील असे लावणे.

vi. **योजनेचा उद्देश – राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटी करणासाठी अनुदान वितरीत करणे.**

**योजनेचे स्वरुप -**

१. ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे कडील **शासन निर्णय क्रमांक पंविआ २०२० /प्र.क्र.५९/वित्त-४ दिनांक २६ जून, २०२० अ**न्वये दिनांक १ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२५ या कालावधीत केंद्रशासनाकडून राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला मुलभूत/बेसिक अनुदान (अनटाईड) व बंधित अनुदान (टाईड) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरुपात निधी प्राप्त होणार आहे.

प्रस्तुत अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि ग्रामपंचायत या तिन्ही स्तरासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे

सदर निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार केली आहे. प्रस्तुत निधी १) मुलभूत/ बेसिक अनुदान (अनटाईड) व २) बंधित अनुदान (टाईड) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणार असून ते ५०% - ५०% च्या प्रमाणात विभागण्यात आले आहे.

**१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधी वाटपाचे निकष-**

| अ.क्र. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | जिल्ह्याची ग्रामिण लोकसंख्या (सन २०११ च्या जनगनणेनुसार) | ९०% |
| २ | जिल्ह्याचे ग्रामिण क्षेत्रफळ | १०% |
| | एकूण | १००% |

**१५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीमधून ग्रामपंचायतींनी हाती घ्यावयाची कामे बाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र.ठाजिप/ग्रापं/योज-२/२२७ दिनांक ५.११.२०२०. अन्वये खालील प्रमाणे विस्तुत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.**

**ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक २६.६.२०२० मधील मुद्दा क्र. (ब) नुसार .**

v. **१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतून पंचायत राज संस्थांनी करावयाच्या मुख्य बाबी :-**

१. **मुलभूत/बेसिक अनुदान :-** अबंधित (अनटाईड) स्वरुपाचा असून सदर अनुदानाचा ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनूसार (Location Specific Felt Needs) आवश्यक बाबींवर वापर करावा.

**२) बंधित /टाईड अनुदान :- बंधित अनुदानाचा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे.**

१. स्वच्छता आणि हगणदारीमुक्त दर्जा राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरुस्ती.

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुर्नभरण/ पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), जल पुर्नप्रक्रीया (वॉटर रिसायकलींग)बंधित अनुदानाचा ५०% निधी हा वरील नमुद दोन बाबींसाठी करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पुर्णत: अंमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी दुसऱ्या बाबीसाठी खर्च करण्यात यावा. असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

वरील प्रमाणे १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून अबंधित व बंधित अनुदानामधून पंचायत राज संस्थांनी करावयाच्या बाबींबाबत स्पष्ट मार्गदर्शन केलेले आहे. तरीही आपणांस अधिक सविस्तर मार्गदर्शन होणेसाठी सदर बंधित व अबंधित निधीमधून सर्वसाधारण कोणती कामे घेता येतील याबाबत खालील प्रमाणे (क), (ख) आणि (ग) नुसार Illustrative List (स्पष्टीकरणात्मक यादी) यादी देण्यात येत आहे. तथापि वर नमुद केल्याप्रमाणे मुख्य बाबींमध्ये यासारखीच बसणारी कामे देखील घेता येतील.

१. १५ वा वित्त आयोगांतर्गत **बंधित निधी** मधून घ्यावयाची सर्वसाधारण कामे खालील प्रमाणे आहेत.

१. **स्वच्छता आणि हगणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरुस्ती अंतर्गत** :-

१. सार्वजनिक शौचालय बांधणे. (२) बंदिस्त नाली बांधणे.

३) कंपोस्ट खत तयार करणे. (४) गांडूळ खत तयार करणे.

५) शोष खड्डे. (६) रस्ते/ चौकात वॉश बेसीन.

७) धोबी घाट. (८) गोबर गॅस.

९. सार्वजनिक शौचालय दुरुस्ती. (१०) प्राथमिक शाळा,अंगणवाडी येथे मुतारी व शौचालय बांधणे.

११) कचरा संकलन व वाहतूक करीता घंटागाडी (१२) घनकचरा व्यवस्थापन.

१३) ग्रामपंचायत, मंदीर, बाजार, बसस्थानक येथे सार्वजनिक शौचालय, मुतारी बांधणे.

**ब) (१) पाणीपुरवठा योजना अंतर्गत :-**

१) नळ पाणीपुरवठा योजनेचा विस्तार. (२) नळ पाईप दुरुस्ती.

३) पाण्याची विद्युत मोटार दुरुस्ती. (४)पिण्याच्या पाण्याची विहिर दुरुस्ती करणे.५) पाणीपुरवठा योजनेचे लिकेजेस काढणे. (६) वाडी व वस्ती करीता पाणी पुरवठा करणे. ७) आर.ओ. प्लँट बसविणे. (८) पिण्याच्या पाण्याची टाकी दुरुस्ती.

९) वॉल बसविणे. (१०) चेंबर दुरुस्ती ११) नळाला तोट्या बसविणे. (१२) स्टँड पोस्ट दुरुस्ती.१३) नविन विंधन विहिर/ विंधन विहिर दुरुस्ती (१४) हातपंप दुरुस्ती.

१५) विंधन विहिरी जवळ पाणी साठा करण्यासाठी (१६) हातपंपावर नविन विद्युतपंप बसविणे.टाकी बांधणे. १७) नविन वस्तीत विंधन विहिर घेणे. (१८) साधी विहिर – नविन विहिर घेणे/ विहिर दुरुस्ती १९) ग्रापं/शाळा/अंगणवाडी/प्रा.आ.केंद्र येथे नळ बसविणे. (२०) जनावराच्या पिण्याच्या पाण्याकरीता हौद २१) कुटुंबासाठी वॉटर मिटर बसविणे. (२२) न.पा.पू स्वयंचलित क्लोरीन डोसर बसवणे. २३) पिण्याच्या पाण्याच्या विहिरीवर संरक्षक जाळी बसविणे.२४) पेयजल योजनेच्या स्त्रोताला बळकटी आणण्यासाठी अपारंपारीक उपाययोजना – हायड्रो फ्रॅक्चरींग जाकेट वेल टेक्नीक, फ्राकवासील सिमेंटेशन.

**(२) पावसाचे पाणी संकलन, पुर्नभरण व पाण्याचा पुर्नवापर :-**

१. रुफ वॉटर हार्वेस्टिंग

२. शिवारातील पाणी शिवारात जिरवण्यासाठी माती बांध, शेततळे, सिमेंट बांध, गाव तळे बांधणे.

३. सार्वजनिक विहिर पुनर्भरण.

४. बंधीस्त गटारे.

५. देखभाल दुरुस्ती – गावातील गावतळे

१५ वा वित्त आयोगांतर्गत **अबंधित निधी मधून** घ्यावयाची सर्वसाधारण कामे खालील प्रमाणे आहेत.

१. पेयजल व पाण्याच्या साठवणूकीचे साधन.
२. मुलांचे लसीकरण, मुलांचे कुपोषण रोखणे.
३. ग्रामपंचायती अंतर्गत रस्ते दुरुस्ती व देखभाल.
४. ग्रामपंचायती अंतर्गत पादचारी रस्ते व बांधकाम दुरुस्ती.
५. एलईडी दिवे व सौर प्रकाश दिवे उभारणी व दुरुस्ती व देखभाल (सोलर स्ट्रीट लाईट वैयक्तीक पोल किंवा केंद्रीकृत सौर पॅनल असु शकते) विद्युतीकरणावरील खर्च.
६. स्मशानभूमीचे बांधकाम, दुरुस्ती व देखभाल आणि स्मशानभूमीसाठी जमीन संपादन, जमीन अधिगृहण आणि देखभाल आणि मृतदेह दफनभूमीची देखभाल.
७. ग्रामपंचायतींना पुरेसे आणि उच्च बँड विडथ वाय फाय नेटवर्क सेवा प्रदान करणे.
८. सार्वजनिक वाचनालय.
९. ग्रामपंचायतींमध्ये मुलांच्या उद्यानासह मनोरंजन सुविधा, खेळाचे मैदान
१०. रुरल हट (ग्रामीण भागात आठवडी बाजार सोय)

११. नैसर्गीक आपत्ती/साथीच्या रोगात तात्काळ मदत कार्य सुविधा उपलब्ध करून देणे.
१२. क्रिडा व शारिरीक तंदुरुस्ती साहीत्य (व्यायात शाळा)
१३. घनकचरा व्यवस्थापन.
१४. मुलभूत आणि इतर प्रशासकीय खर्चासाठी आवश्यक असणाऱ्या बाबीकरीता.
१५. जैविक विविधता कायदा २००२ चे कलम ४१ (१) अंतर्गत जैव विविधता नोंदवह्या तयार करणे.
१६. ड्रेनेज व तुंबलेल्या पाण्याचे व्यवस्थापन.
१७. आकस्मीक आपत्ती व्यवस्थापन.

१. **१५ वा वित्त आयोगांतर्गत अबंधित निधी मधून खर्च करण्यास अनुज्ञेय नसलेल्या सर्वसाधारण बाबी**

**खालील प्रमाणे आहेत.**

१. एकाच योजनेवर दुबार खर्च करू नये.
२. समारंभ.
३. सांस्कृतीक कार्यक्रम.
४. सजावट.
५. उद्घाटन.
(६) मानधन
(७) T.A/ D.A
(८) पगार
(९) बक्षिसे
(१०) गाड्यांची खरेदी.

**केंद्र पुरस्कृत १५ वा वित्त आयोग या योजनेंतर्गत सन २०२०- २१ ते २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये अहिल्यानगर जिल्हा परिषदे अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधीचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | स्तर | वितरीत निधी | | |
|---|---|---|---|---|
| | | अबंधित (अनटाईड) | बंधित (टाईड) | एकूण |
| १ | जिल्हा परिषद स्तरावर १०% | ३१०२७२०३५ | २६७२५६४४२ | ५७७५२८४७७ |
| २ | पंचायत समिती स्तरावर १०% | ३१०२७२०३५ | २६७२५६४४२ | ५७७५२८४७७ |
| ३ | ग्राम पंचायत स्तरावर ८०% | ५५७९९७३९५४ | ४१७०१९३५०३ | ९७५०१६७४५७ |
| | एकुण | ६२००५१८०२४ | ४७०४७०६३८७ | १०९०५२२४४११ |

| अं.क्र. | विभाग | योजना | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत विभाग | ग्रामपंचायत यात्रा स्थळ विकास कार्यक्रम | ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांचा विकास करणे. यात्रेकरु / प्रवासींना प्राथमिक स्वरुपाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे -तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांना भेट देणा-या यात्रेकरु / प्रवाशांची संख्या वार्षिक एक लाख असणे आवश्यक -यात्रा स्थळांपर्यतच्या जोड रस्त्याचे बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालये, धर्मशाळा, वाहनतळ, बगीचा इ. स्वरुपाची पायाभूत सुविधा. |
| २ | ग्रामपंचायत विभाग | ग्रामपंचायतीना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठया ग्रामपंचायतींचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, कृषि औद्योगिक आणि वाणिज्यिक विकास करणे. त्यासाठी प्राधान्याने व प्राथम्याने तेथील राहणीमान दर्जेदार होण्यासाठी शहराच्या तोडीच्या मूलभत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध करुन देणे. कामाचे स्वरुप :- १)नियोजनबध्द विकास २) बाजारपेठविकास ३) सार्वजनिक दिवाबत्तीची सोय ४) बागबगिचे, उद्याने तयार करणे ५) अभ्यासकेद्र बांधणे. |
| ३ | ग्रामपंचायत विभाग | ग्रामपंचायतीना जन सुविधांसाठी विशेष अनुदान | -जिल्हा नियोजन समितीमार्फत ग्रामीण भागात दहन/दफनभूमीमध्ये तसेच ग्रा.पं. कार्यालय इमारत बांधणे याबाबीमध्ये अनुषंगिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे -ग्रामसभेमार्फत निवडलेल्या कामांना ग्रामपंचायतीने मंजूरी देणे आवश्यक -संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मार्फत जिल्हा परिषदेकडे. |
| ६ | ग्रामपंचायत विभाग | ग्राम योजना (स्मार्ट ग्राम ) | महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास (Sustainable Village Development) घडवून आणण्याकरीता ग्रामोथ्थान अभियान सुरु करण्यात आलेले आहे. भैातिक (Physical), सामाजिक (Social) व उत्पन्न साधने (Livelihood) या तीन क्षेत्रात शासनाच्या आर्थिक तांत्रिक व प्रशासकिय सहकार्याने, लोकांच्या पुढाकाराने हा विकास अपेक्षित होणार आहे. यापैकी दर्जेदार भौतिक मुलभूत सुविधा साठीचा हा कार्यक्रम आहे. शाश्वत ग्रामविकास संकल्पनेत महत्त्वाचे तत्त्व असे आहे की, गावात एकीकडे उच्च प्रतिच्या भौतिक सुविधांची निर्मिती करतानाच यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल याचाही प्राथम्याने विचार झाला पाहिजे. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | होत आहे, त्यामुळे Global Warming सारखे अनेक विषय मुळ धरु पाहत आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करुन समृध्द व संपन्न गांवाची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे म्हणून शासनाने पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनो सन २०१०-११ मध्ये सुरु केली. पर्यावरणीय संतुलन राखून गावाचा शाश्वत विकास हा या योजनेचा मूळ उद्देश आहे या योजनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत : १)पर्यावरण समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळविणे. २)पर्यावरणाचे भान ठेऊन भौतिक सुविधा उपलब्ध करणे व इको व्हिलेजची संकल्पना राबवून समृध्द ग्राम निर्माण करणे. ३)यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरीय विविध योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे व जेथे ही संकल्पना राबविण्यासाठी नव्या योजनांची, कार्यक्रमांची गरज आहे, ती पोकळी भरण्यासाठी तसेकार्यक्रम/योजना ग्रामविकास विभागामार्फत कार्यान्वित करणे. ४)मोठया ग्रामपंचायतींना विकास केंद्र म्हणून विकसीत करणे. ***योजनेंअंतर्गत घेण्यात येणारे कामे : शासनाकडून प्राप्त झालेल्या या योजनेचा निधी ग्रामपंचायतींना रोपवाटिका व वृक्षसंवर्धन, गावातील घनकच-याचे व्यवस्थापन (मुख्यत: संकलन व प्रक्रिया, विविध जैवीक व पर्यावरण संतुलीत तंत्रज्ञानाचा वापर करून), गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन, जलनि:सारण गटारे, रस्त्यावरील दिवाबत्ती- सौर पथदिवे, अपारंपारीक उर्जा विकास व वापर (पवन, सौर,जैवीक, इ.), दहन-दफन भूमी बांधकाम व त्यासाठी आवश्यक इतर सोईसुविधा पुरविणे, स्मृती उद्यान, ग्रामपंचायती अंतर्गत गावे व वाडयांना जोडणारे साकव बांधकाम, उद्याने व बस थांबा, राजीव गांधी भारत निर्माण ग्राम सुविधा केंद्र, पर्यावरण संतुलीत विकासाकरीता इतर नाविन्यपूर्ण प्रकल्प इत्यादी मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरीता देण्यात येईल. |